Vol 2 Issue 9 March 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 9, March. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *"नांदेड शहरातील शालेय विद्यार्थीनींचा आंतरशालेय कीडा स्पर्धा सहभागाबद्दल पालकांचा दृष्टीकोन अभ्यासणे"*

*सीमा श्रीकांत सबनीस*

कुसुमताई चव्हाण डी.टी.एड. कॉलेज,
नांदेड

***सारांश:***

"नांदेड शहरातील शालेय विदयार्थिनींचा आंतरशालेय कीडा सहभागाबद्दल पालकांचा दृष्टिकोन अभ्यासणे"

वरील विषयाच्या अभ्यासासाठी संशोधिकेने शारीरिक शिक्षणांवरील विविध बाबींवर असलेली प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीत एकूण 20 प्रश्न पालकांसाठी त्यांचे मत जाणून घेण्यासाठी देण्यात आले. या प्रश्नामध्ये त्यांच्या मुलींचा कीडा स्पर्धेत सहभाग असतो की नाही. किती पालक आपल्या मुलींना कीडा स्पर्धेत सहभाग घेउ देतात तसेच त्यांना प्रोत्साहित करतात की नाही याचा विचार करुन प्रश्न विचारण्यात आले आहे. पालक आपल्या मुलींना बाहेरगावी जर कीडा स्पर्धा असतील तर जाण्यास परवानगी देतात की नाही यावरचे त्यांचे मत काय आहे ते पालक का जाउ देत नाहीत ?त्यांच्या मुलींना बाहेरगावी स्पर्धेसाठी न जाउ देण्याची कारणे काय आहेत तसेच जेव्हा स्पर्धा असतील तेंव्हा पालक स्वतः मुली सोबत जातात की नाही . जे पालक जात असतील तर ते का जातात याचे कारणे विचारली गेली त्याच प्रमाणे पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे की नाही हे जाणून घेण्याचा प्रयत्न या प्रश्नावलीमध्ये करण्यात आला. ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे असे पालक आपल्या मुलीला खेळासाठी लागणारा सर्व खर्च ते करावयास तयार आहेत की नाही याची देखील या प्रश्नावलीमध्ये दखल घेण्यात आली आहे. पालकांना असे वाटते का ?की, मुलींनी कीडा स्पर्धेत खेळात सहभाग घेतला तर त्यांना त्याचा भविष्यात उपयोग होईल. असा प्रश्न टाकून कीडा स्पर्धेतील सहभागाबद्दल पालकांचा उद्देश जाणून घेण्याचा प्रयत्न या प्रश्नावलीमध्ये करण्यात आला आहे.

षालेय स्तरावर शारीरिक शिक्षण हा विषय अनिवार्य असावा काय ?याबद्दलचे पालकांचे मत विचारण्यात आले तसेच आपल्या मुलींना शाळेत कमीत कमी एका तरी खेळात सहभाग घेणे सक्तीचे करावे यावरचे मत जाणून घेण्यासाठी हा प्रश्न प्रश्नावली मध्ये मांडण्यात आला आहे.

मुलींच्या कीडा सहभागाबद्दल पालकांचा सामाजिक दृष्टिकोन कसा आहे हे प्रत्यक्ष विचारण्यात आले आहे.

अशा प्रकारचे जवळपास 20 प्रश्न विचारले गेले, 40 पालकांकडून प्रश्नावली भरुन घेतली. प्रथम काही पालकांनाी भरुन दिली. परंतू काही पालकांनी भरण्यास नकार दिला. त्यामुळे पुन्हा नुन्हा तेथे जाउन वातावरण निर्मिती करुन त्यांच्याकडून प्रश्नावली भ्रुन घेउन त्यावरुन गोळा केलेल्या माहितीवरुन संशोधिकेने असे मत काढले आहे की, माध्यमिक शाळेतील मुलींच्या पालकांना असे वाटते की, त्यांच्या मुलींनाी कीडा स्पर्धेत भाग घ्यावा.

***प्रस्तावना :—***

अलीकडील विज्ञान युगाच्या काळात जगातील सर्व राष्ट्रांमध्ये शारीरिक शिक्षणाला अधिक महत्व प्राप्त होत आहे. विज्ञान युगामध्ये मानवाच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. जीवन धकाधकीचे व गतिमान बनले आहे.. सर्व विभागातून प्रदुषण वाढले आहे. त्यामुळे मानवाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ ढासळत चालले आहे. शारीरिक कार्यक्षमता कमी होउ लागली आहे. शारीरिक शिक्षण, खेळ हे उपयुक्त असल्यानेच त्यांना महत्व प्राप्त होत आहे. अलिकडे माध्यमिक शालेय स्तरापासून विश्वविद्यालयापर्यंत शारीरिक शिक्षणास स्थान प्राप्त झाले आहे. तरीही शिक्षित व्यक्तिमध्ये आजही काही गैरसमज आहेत. हालचाल, बल, शक्ती, व्यायाम, खेळ, पी.टी. जिम्नेस्टिक्स अशा अवस्थेमधुन आज शारीरिक शिक्षण या शब्दप्रयोगाचा उगम झाला आहे.

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत व्यायाम, खेळ, स्पर्धा, जिम्नॅस्टिक, कवायत संचलन यांनाच शारीरिक शिक्षण असे समजण्यात येत होते, परंतु अलीकडील काळात या विषयामध्ये अनेक बाबींचा समावेश झाला आहे. हा एक विषय आता मानवी जीवनाशी निगडीत बनला आहे. अनेक कीडा बाबींचा अनेक क्षेत्रात उपयोगही केला जात आहे. शारीरिक शिक्षण हे फक्त शारीरिक विकास करण्याचे साधन नसून व्यक्तिचा सर्वांगिण विकास करण्याचे साधन बनले आहे. यामुळे त्याची व्याप्ती वाढून त्यांना अनेक क्षेत्राशी आता संबंध येत आहेत.

शिक्षण क्षेत्राबरोबरच रेल्वे, बॅंका, दुरध्वनी उद्योगधंदे कारखाने, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, राज्यमार्ग, परिवहन महामंडळ, विद्युत महामंडळ, पोलिस इत्यादी सर्व क्षेत्रामध्ये आज कीडा स्पर्धा घेतल्या जात आहेत व तेथील कर्मचारी कामगार यांचे मनोरंजन करुन कार्यक्षमता टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. शहराबरोबरच ग्रामीण कीडा स्पर्धा, महिला कीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. राज्याबरोबरच केंद्रातही आता कीडा खाते निर्माण झाले आहे. शासनाने विविध योजना देखिल कीडा क्षेत्रात

राबविल्या आहेत. उदा.क्रीडा प्रबोधिनी, नेहरु युवा केंद्र, राष्ट्रीय शारीरिक क्षमता कार्यक्रम ई.

मुलींसाठी महिलांसाठी विविध गटात स्पर्धा ठेवल्या असून देखील आज मूलींचा खेळात सहभाग पाहिजे तेवढा दिसत नाही. समाजामध्ये इतर घटकांचा तुलनेने महिला वर्गास फारसे स्थान नसते असे दैनंदिन जीवनातून वावरतांना आढळून येते. कोणत्याही समाजातील महिलाकडे बघण्याचा दृष्टिकोन कमी जास्त प्रमाणात हीन दर्जाचा असतो. असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही.

मुली आपल्या भोवतालच्या सृष्टितील व्यवहानात गुरफटून जातात. बंधने त्यांना स्वीकारावी लागतात. स्वतःच्या निवडीचे–आवडीचे वळण लोप पावते. समाजासाठी त्यांना बंधने पाळावी लागतात.

आज 21 व्या शतकाकडे वाटचाल करणारी स्त्री परंपरागत रुढींना, चालीरीतींना बाजूला सारुन पुरुष–प्रधान समाजामध्ये प्रत्यशेक क्षेत्रात आपले आगळे वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करु लागली आहे. परंतु काही लोकांचा शारीरिक शिक्षणाबद्दल असलेल्या गैरसमजामुळे ते आपल्या मुलींना खेळास किंवा क्रीडा क्षेत्रात पाठवत नाहीत. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया ळया पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत पुरुषांपेक्षा तिची नैसर्गिकच कार्यक्षमता कमी असली तरी देखील ती मागे नाही. खेळात देखिल पी.टी. उषा, ज्योतिर्मयी मेरी कोम सारख्या महिला खेळाडू भारताला सुवर्ण पदक मिळवून देतात एवढे पदक आज भारतात मुली मिळवून देतात. तरी देखाील लोकसंख्येच्या मानाने भारत पदक मिळविण्याच्या बाबतीत मागेच आहे. मुलींच्या संख्येच्या मानाने खुप कमी मुली खेळामध्ये स्पर्धेमध्ये भाग घेतात. स्पर्धेत भाग न घेण्याच्या मागे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे पालकांचा दृष्टिकोन योग्य नाही. त्यांच्या मनात असलेल्या खेळांबद्दलच्या चुकीच्या कल्पना यामुळे ते आपल्या मुलींना खेळात सहभाग घेण्याची परवानगी देतात. परंतु ग्रामीण भागातील पालक मुलींना शाळेतच पाठवतात हेच त्यांना आपण काय करत आहोत असं वाटत. तर खेळात सहभाग घेणं हे तर फारच लांबचं झालं. काही पालकांची आर्थिक अडचण असते त्यामुळे ते मुलींना खेळासाठी स्पर्धेसाठी लागणारा खर्च ते देउ शकत नाहीत.

***समस्या कथनः–***

"नांदेड शहरातील शालेय विद्यार्थिनींचा आंतर शालेय क्रीडा स्पर्धा सहभागाबद्दल पालकांचा दृष्टिकोन अभ्यासणे" ही समस्या संशोधिकेने संशोधनासाठी घेतली आहे. व्यक्ति तितक्या प्रवृत्ती या अनुषंगाने पालकांचा मुलींने क्रीडा स्पर्धेत भाग घेण्याबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. जरी सरकार मुलींसाठी विविध स्पर्धेचे कार्यक्रम राबवित असेल तरी मुलींच्या पालकांचे आंतरशालेय क्रीडा स्पर्धेतील मुलींच्या सहभगाबद्दल असलेले समज गैरसमज जाणून घेण्यासाठी तसेच त्याबद्दलचे त्यांचे वैयक्तिक मत विचारुन घेण्यासाठी तसेच त्याबद्दलचे त्यांचे वैयक्तिक मत विचारुन घेण्यासाठी संशोधकांनी संशोधन पध्दतीचा अवलंब करुन विदयार्थिनींच्या पालकांचे मत प्रश्नावलीव्दारे विचारात घेतले व त्यावरुन निष्कर्ष काढले.

***समस्येचे महत्वः–***

मुली जरी खेळात स्पर्धेत भाग घेत असल्या तरी त्यांच्या पालकांना त्याची वैयक्तिक मते असू शकतात. त्यांच्या मनाची कल्पना ते व्यक्त करु शकतात. म्हणून मुलींचा आंतरशालेय क्रीडा स्पर्धा सहभागाबद्दल त्यांच्या पालकांचे विचार किंवा त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडून प्रश्नावली सोडवून घेणे आवश्यक आहे असे वाटते. म्हणून संशोधकाने हया विषयाबद्दल पालकांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न या लघुप्रबंधाव्दारे केला आहे.

***परिकल्पनाः–***

संशोधकानो असे गृहित धरले आहे की, प्रत्येक मानवाचे विचार हे भिन्न प्रकारचे असतात. म्हणजेच प्रत्येक मुलींच्या पालकांची मते पोषक वा बाधक ही असू शकतात.

***मर्यादाः–***

या विषयाच्या अभ्यासासाठी फक्त नांदेड शहरातील निवडक शाळांचा अभ्यास केला आहे.आंतरशालेय स्पर्धेचाच विचार करण्यात आला आहे. आंतर विदयार्थीनींच्या पालकांच्या पुरताच मर्यादित विचार करण्यात आला आहे.

***संशोधन पध्दती***

कोणतेही कार्य करण्यापूर्वी हया कार्याची रुपरेषा निश्चित करावी लागते. त्याच्याच आधारे हे कार्य पूर्ण होत असते. योग्य रुपरेषा बनविली नाही तर केलेले परिश्रम वाया जातात म्हणून संशोधन कार्य काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. ज्य्राच्या आधारे प्रबंधक आपल्या कामाला योग्य दिशेने पुढे नेउ शकतो. योग्य प्रकारे केले गेलेले संशोधन प्रबंधकाला मार्गदर्शक ठरु शकते. कारण योग्य तंत्राच्या आधारे या बाबीची माहिति मिळते की, संशोधन कोणत्या पध्दतीने व प्रणालीच्या व्दारे पूर्ण केले गेले आहे.

प्रबंधकाने प्रश्नावली व्दारे व मुलाखती घेउन माध्यमिक शाळेतील खेळाडू असणा–या विदयार्थिनींच्या पालकांची मते विचारात घेतली त्यानुसार खेळामध्ये, स्पर्धेत येणा–या वेगवेगळया बाबींवर प्रश्नावली तयार केली व नंतर त्यासाठी नांदेड श्शहरातील खेळाडूंच्या पालकांच्या मुलाखती करिता वेळ ठरवून घेतली, हया वेळा प्रत्यक्ष भेटून, फोन करुन, संपर्क करुन ठरविण्यात आल्या. सर्वांशी चर्चा करुन सदर प्रबंधकास योग्य अशा प्रकारे मुलाखत घेण्यात आली.

प्रथम दिलेल्या वेळेनुसार पालकांच्या भेटीस संशोधक गेले व राहिलेल्यांच्या भेटीस संशोधक परत भेटून त्यांच्या वेळा ठरविण्यात आल्या व सर्वांशी प्रश्नावलीतील असलेल्या प्रश्नावर चर्चा करुन प्रश्नावली भ्रुन घेउन सदर प्रबंधास योग्य अशा प्रकारे मुलाखत घेण्यात आली. नंतर प्रश्नावलीचा संघटात्मक आढावा घेण्यात आला. अशा त–हेने तयार झालेल्या आढाव्याचा सारांश करुन त्यावर सांख्यिकीय पध्दतीने निष्कर्ष काढण्यात आले.

अशा रितीने संशोधकाने या प्रबंधाचे संशोधन केले.

***संकलीत माहितीचे पृथःकरण***

संशोधकाने मुलींच्या पालकाकडून प्रश्नावली भरुन घेतली त्यावरुन गोळा केलेल्या माहितीचे पृथःकरण करुन एकंदर उत्तरांना

मतांना मिळालेली टक्केवारी दर्शविणारे तक्ते खालील प्रमाणे आहेत.

तक्ता क्र. २

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत आपण सहभाग घेतला काय ? | ८७.५ % | १२.५ % |

आलेल्या टक्केवारीवरुन ८७.५ टक्के पालकांनी क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

तक्ता क्र. ३

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| आपल्या मुलीने कोणत्या खेळात सहभाग घेतला आहे काय ? | ७५ % | २५ % |

वरील झालेल्या टक्केवारीवरुन ७५ टक्के मुलींनी खेळात सहभाग घेतला आहे.

तक्ता क्र. ४

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| अभ्यासाशिवाय खेळाच्या सरावासाठी आपण तिला दररोज जास्तीचा वेळ देता काय ? | ८१.२५ % | १८.७५ % |

८१.२५ टक्के पालक मुलींना खेळाच्या सरावासाठी वेळ देतात.

तक्ता क्र. ५

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| ती स्पर्धेत खेळताना आपण तिथे हजर राहता काय ? | ४३.७५ % | ५६.२५ % |

५६.२५ टक्के पालक स्पर्धेत आपली मुलगी खेळताना तेथे हजर राहत नाहीत.

तक्ता क्र. ६

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| बाहेरगावी स्पर्धेसाठी जाण्यासाठी आपण तिला परवानगी देता काय ? | ६८.७५ % | ३१.२५ % |

वरील आलेल्या टक्केवारीवरुन ६८.७५ टक्के पालक आपल्या मुलीना बाहेरगावी क्रीडा स्पर्धेसाठी जाण्याची परवानगी देतात.

तक्ता क्र. ७

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| बाहेरगावी क्रीडा स्पर्धेसाठी जाताना आपण तिच्या सोबत जाणे योग्य आहे काय ? | ६.२५ % | ९३.७५ % |

वरील आलेल्या टक्केवारीवरुन ९३.७५ टक्के पालक मुलगी क्रीडा स्पर्धेसाठी बाहेर गावी जात असल्यास तीच्या सोबत जाणे त्याना योग्य वाटत नाही.

तक्ता क्र. ८

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| आपल्या मुली शाळेतर्फे क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात काय ? | ६२.५ % | ३७.५ % |

६२.५ टक्के मुली शाळेतर्फे क्रीडा स्पर्धेत सहभागी होत असतात.

तक्ता क्र. ९

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| आपल्या मुलीने क्रीडा स्पर्धेत यष मिळवले तर त्याचा आपणास अभिमान वाटतो काय ? | ७५ % | २५ % |

७५ टक्के पालकांना आपल्या मुलीने क्रीडा स्पर्धेत यष मिळवले तर त्याचा अभिमान वाटतो.

तक्ता क्र. १०

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| विद्यार्थिनींचा क्रीडा स्पर्धेसाठी जो गणवेष वापरण्यात येतो तो योग्य असतो काय ? | ५० % | ५० % |

वरील आलेल्या टक्केवारीवरुन ५० टक्के मुलींचा खेळासाठी असलेला गणवेष चांगला आहे असे वाटते.

तक्ता क्र. ११

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| मुलीच्यासाठी क्रीडा साहित्य व क्रीडा पोषाख स्वतःचा आहे काय ? | १८.७५ % | ८१.२५ % |

वरील आलेल्या टक्केवारीवरुन ८१.२५ टक्के पालकांनी असे सांगितले की मुलींसाठी क्रीडा साहित्य व क्रीडा पोषाख हा त्यांचा स्वतःचा नसतो.

तक्ता क्र. १२

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे विद्यार्थीनींचा व्यक्तिमत्व विकास होतो काय ? | ९० % | १० % |

वरील आलेल्या टक्केवारीवरुन ९० टक्के पालकांना असे वाटते की क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे विद्यार्थीनींचा व्यक्तिमत्व विकास होतो.

तक्ता क्र. १३

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे त्याचा भविष्यात उपयोग होतो काय ? | ५२.५ % | ४७.५ % |

५२.५ टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे मुलींना त्याचा भविष्यात नक्कीच उपयोग होतो.

तक्ता क्र. १४

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत भाग घेणे किंवा खेळणे हे फक्त मनोरंजनाचे साधन आहे काय ? | ४३.७५ % | ५६.२५ % |

५६.२५ टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडा स्पर्धेत भाग घेणे किंवा खेळणे हे मनोरंजनाचे साधन नाही.

तक्ता क्र. १५

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे मुलींमध्ये धिटपणा येतो काय ? | ७८.७५ % | २१.२५ % |

७८.७५ टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे मुलींमध्ये धीटपणा येतो.

तक्ता क्र. १६

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे मुलींमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होतो काय ? | ९१.२५ % | ८.२५ % |

९१.२५ टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडा स्पर्धेत सहभागी झाल्यामूळे मुलींमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होतो.

तक्ता क्र. १७

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| शाळेमध्ये विदयार्थीनीना कमीत कमी एका तरी खेळात खेळणे सक्तीचे करावे असे आपणांस वाटते काय ? | १०० % | ० % |

शाळेमध्ये विदयार्थीनीना खेळामध्ये सहभागी होणे सक्तीचे करावे असे १०० टक्के पालकांना वाटते

तक्ता क्र. १८

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा किंवा शारीरिक षिक्षण हा विषय शालेय स्तरावर अनिवार्य असावा असे आपणास वाटते काय ? | १०० % | ० % |

१०० टक्के पालकांना असे वाटते की, शालेय स्तरावर शारीरिक षिक्षण हा विषय शालेय स्तरावर अनिवार्य असावा.

तक्ता क्र. १९

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडास्पर्धेमुळे मुलीमध्ये बंधुभावाची भावना निर्माण होते काय ? | ५० % | ५० % |

५० टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडास्पर्धेमुळे मुलीमध्ये बंधुभावाची भावना निर्माण होते.

तक्ता क्र. २०

| | मतांची विभागणी | |
|---|---|---|
| प्रश्न | होय | नाही |
| क्रीडा स्पर्धेच्या सरावासाठी मिळणारा वेळ व मार्गदर्षन पुरेसे व योग्य वाटते काय ? | ४० % | ६० % |

६० टक्के पालकांना असे वाटते की, क्रीडा स्पर्धेच्या सरावासाठी मुलींना मिळणार वेळ व मार्गदर्षन पुरेसे व योग्य वाटत नाही.

***संकलीत माहितीचे विश्लेषण***

***निष्कर्षः—***

"नांदेड शहरातील शालेय विदयार्थिनींचा आंतरशालेय क्रीडा स्पर्धा सहभागाबद्दल पालकांचा दृष्टिकोन अभ्यासणे"

हा विषय संशोधिकेने अभ्यासासाठी घेतला. त्यासाठी संशोधिकेने मुलींच्या पालकांकडून प्रश्नावली भरुन घेतली त्या प्रश्नावलीवरुन माहिती गोळा करुन टक्केवारी काढली. त्यावरुन संशोधिकेने असे निष्कर्ष काढले की, शारीरिक शिक्षण हा विषय शालेय अभ्यासक्रमात अनिवार्य असावा. क्रीडा स्पर्धेमुळे मुलींचा वक्तिमत्व विकास होतो. मुलींना शाळेत खेळात सहभाग घेणे सक्तीचे करावे. क्रीडा स्पर्धेमुळे मुलींमध्ये नेतृत्व गुण निर्माण होतात. क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामुळे मूलींना त्याचा भविष्यात उपयोग होतो. क्रीडा स्पर्धेत भाग घेणे किंवा खेळणे हे मनोरंजनाचे साधन नाही. क्रीडा स्पर्धेत भाग घेतल्यामूळे मुलींमध्ये धीटपणा येतो. क्रीडा स्पर्धेमुळे मुलींमध्ये बंधुभावाची भावना निर्माण होतो. एकंदरीत मुलींचा क्रीडा स्पर्धेतील सहभागामुळे व्यक्तिमत्व विकास होतो. भविष्यात त्याचा उपयोग होत असल्याने पालकांचा शारीरिक शिक्षण व क्रीडा स्पर्धा यात मुलींचा सहभाग असावा याकडे पालकांचा कौल जास्तीचा दिसून येतो.

***शिफारशी***

माध्यमिक शाळेतील इतर विषयांची ज्या प्रमाणे 100 मार्कांची परिक्षा घेण्यात येते त्याच प्रमाणे शारीरिक शिक्षणाची परीक्षा घेण्यात यावी.
मुलींसाठी खास क्रीडा मार्गदर्शकाची नेमणून माध्यमिक शाळेत करण्यात यावी.
विदयार्थीनींना क्रीडा सहभागासाठी पोषक वातावरण प्रत्येक शाळेत तयार करण्यात यावे.
क्रीडा क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी विदयार्थीनींना विशेष सवलती देण्यात याव्यात.
शालेय वार्षिक कार्यक्रमात त्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष आदर करण्यात यावा.
आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या होतकरु खेळाडू मुलींना फी व इतर आर्थिक बाबतीत सवलती देण्यात याव्यात.
गुणवत्ताधारक खेळाडूंच्या नावाचे फलक शाळेत लावावे.
शासनाने राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडुंना 19 ते 20 टक्के गुणवाढ देण्यात आली आहे. अशा बाबी खेळाडूंच्या हितासाठी असतात, याची माहिती शालेय प्रशासनाव्दारे करुन दयावी.

### *संदर्भ ग्रंथ सूची*

शारीरिक शिक्षणाचे तत्वे व स्वरुप – प्रा. श्रीपाल जर्दे व सुनिता जर्दे
शरीरिक शिक्षणाचा ओनामा– भास्कर गोगटे
शारीरिक शिक्षणशास्त्र – प्रा. के. एन्. गंदगे व प्रा. उत्तम अ. धुमाळ
शारीरिक शिक्षणाचा विकास भाग एक व दोन– प्रा. द. ब. कोठीवाले
शारीरिक शिक्षणाची तत्वे व मनोरंजन– दि. गो. वाखारकर
Bibliographical Dissertation Abstracts - Dr.V.A.Vaidya Mr. Ashok K, Jha Amrawati University 1985-1990

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net